**कोविड-१९ उपाययोजनेंतर्गत अत्यावश्यक औषधांची खरेदी हाफकिन महामंडळाकडून करण्यास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.**

# महाराष्ट्र शासन

## वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग

शासन निर्णय क्र. कोविड-२०२०/प्र.क्र. २६८ /प्रशासन-२
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक :- २० नोव्हेंबर, २०२०

**संदर्भ:-**

१) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्र. खरेदी २०१६/प्र.क्र. ८२/भाग-III, उद्योग-४, दिनांक ०१.१२.२०१६
२) शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्र. भांखस-२०१४/प्र.क्र. २४०/प्रशा-२, दिनांक २६.०७.२०१७
३) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/१३/विनियम , दि. १७.०४.२०१५
४) संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांचे पत्र क्र. संवैशिवसं/औखक/प्रशासकीय मान्यता व निधीबाबत/५९११/२०२०, दि. ०१.१०.२०२०
५) संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांचे पत्र क्र. संवैशिवसं/२१ सापु. खत/कोविड-१९/औखक-१/७३१/२०२० दि. १०.१०.२०२०
६) संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांचे पत्र क्र. संवैशिवसं/२१ सापु. खत/कोविड-१९/औखक-१/७४७-अ/२०२० दि. १४.१०.२०२०
७) वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, शासन निर्णय क्र. कोविड-२०२०/ प्र.क्र. २६८ /प्रशासन-२, दि. २०.१०.२०२०
८) संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांचे पत्र क्र. संवैशिवसं/औखक/२१७१/ /२०२० दि. १९.११.२०२०

**शासन निर्णय :-**

सार्वजनिक आरोग्य विभागाच्या दिनांक २६.०७.२०१७ रोजीच्या शासन निर्णयानुसार वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या अधिपत्याखालील शासकीय वैद्यकीय महाविद्यालये व रूग्णालये आणि संस्था यांना लागणारी औषधी व सर्जिकल साहित्य, रसायने व उपकरणे इत्यादी बाबींची खरेदी

हाफकिन जीव औषध निर्माण महामंडळाकडून खरेदी करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे. कोविड-१९ उपाययोजनेसाठी सप्टेंबर, २०२० च्या अधिवेशनात रू.३००.०० कोटी इतक्या पुरवणी मागणीचा प्रस्ताव मंजूर करण्यात आला आहे. त्या अनुषंगाने संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांनी प्रस्तावित केल्यानुसार Emergency Medicine required for Covid या सदरात कोविड-१९ रुग्णालयांकरीता (Non ICU & ICU) लागणाऱ्या औषधींसाठी रुपये ५३,७३,७२,०००/- (रूपये त्रेपन्न कोटी त्र्याहत्तर लाख बहात्तर हजार फक्त) इतक्या रकमेच्या बाबींची खरेदी हाफकिन महामंडळाकडून करण्यास दिनांक २०.१०.२०२० रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली होती. तथापि, संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांनी दिनांक १९.११.२०२० रोजीच्या पत्रान्वये केलेल्या विनंतीनुसार, दिनांक २०.१०.२०२० रोजीचे प्रशासकीय मान्यतेचे आदेश अधिक्रमित करून Emergency Medicine required for Covid या सदरात कोविड-१९ रुग्णालयांकरीता (Non ICU & ICU) लागणाऱ्या औषधींसाठी रू. १०७,४७,४४,९३८/- (रूपये एकशे सात कोटी सत्तेचाळीस लाख चव्वेचाळीस हजार नऊशे अडतीस फक्त ) इतक्या रकमेच्या परिशिष्ट-अ मध्ये नमूद बाबींची खरेदी हाफकिन महामंडळाकडून करण्यास पुढील अटी व शर्तीच्या अधीन राहून सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

**अटी व शर्ती :-**

१) सार्वजनिक आरोग्य विभागाच्या दिनांक २६.०७.२०१७ रोजीच्या शासन निर्णयानुसार वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या अधिपत्याखालील शासकीय वैद्यकीय महाविद्यालये व रूग्णालये आणि संस्था यांना लागणारी औषधी व सर्जिकल साहित्य, रसायने व उपकरणे इत्यादी बाबींची खरेदी हाफकिन जीव औषध निर्माण महामंडळाकडून खरेदी करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे. त्यानुसार सदर खरेदी करण्यात यावी.

२) सदर औषधी व सर्जिकल साहित्य, रसायने व उपकरणे इत्यादी बाबींची आवश्यकता / मागणी याची शहानिशा / खातरजमा संचालनालयाने करावी.

३) सदरहू औषधी व सर्जिकल साहित्य, रसायने व उपकरणे इत्यादी बाबींची विर्निदिष्टे व्यापक व सर्वसमावेशक असून त्यानुसार सदर बाबींचा पुरवठा करू शकणारे किमान तीन उत्पादक / पुरवठादार यांचेकडून तीन निविदा प्राप्त होऊ शकतील अशा प्रकारची आहेत, याची खातरजमा करण्यात यावी.

४) सदर विषयी "शासकीय विभागाने करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठी कार्यपध्दतीची नियमपुस्तिका" या उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाने निर्गमित केलेल्या शासन

निर्णय क्र. भांखस-२०१४/प्र.क्र८२/भाग/उद्योग-४, दि. ०१.१२.२०१६ मध्ये नमूद विहित कार्यपध्दतीचे अनुपालन करण्यात यावे.

५) सदर खरेदीसाठी प्रस्तावित केलेल्या बाबी विनावापर पडून राहणार नाहीत व त्यांचा विहित मुदतीत वापर होईल, याची दक्षता घेण्यात यावी.

६) खरेदीविषयक बाबींची द्विरूक्ती (duplication) होणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी.

७) हाफकिन जीव औषध निर्माण महामंडळाकडून सदर औषधी व तद्नुषंगिक बाबी प्राप्त करून घेण्यासाठी संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांनी तात्काळ पुढील आवश्यक ती कार्यवाही करावी.

८) कोणत्याही परिस्थितीत उपलब्ध निधीच्या मर्यादेपेक्षा जास्त खर्च करण्यात येऊ नये.

९) संचालक, वैद्यकीय शिक्षण, मुंबई यांनी त्यांच्या २२१०-३३१४ या लेखाशीर्षाखाली कोविड-१९ चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी पुरवणी मागणी द्वारे मंजूर निधीपैकी रू. १०७,४७,४४,९३८/- (रूपये एकशे सात कोटी सत्तेचाळीस लाख चव्वेचाळीस हजार नऊशे अडतीस फक्त) इतका निधी तात्काळ हाफकिन महामंडळाकडे वर्ग करावा.

२. उपरोक्त अनुक्रमांक १ ते ९ येथे नमूद अटींची पूर्तता करण्याची व खरेदी नियमानुसार व आवश्यकतेप्रमाणे आहे हे सुनिश्चित करण्याची संपूर्ण जबाबदारी संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई व सहसंचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय (खरेदी कक्ष) मुंबई यांची राहील.

३. उपरोक्त बाबी खरेदीसाठी येणारा खर्च संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांच्या पुढील लेखाशीर्षामधून भागविण्यात यावा.

मागणी क्रमांक - एस-१
२२१०, वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य
०१-नागरी आरोग्य सेवा - विषम चिकित्सा
०१- संचालन व प्रशासन
(००)(०१)- संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई.
(२२१० ३३१४)
२१- सामुग्री व पुरवठा

४. शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/१३/विनियम , दि. १७.०४.२०१५ अन्वये तसेच वित्तीय अधिकार नियम पुस्तिका भाग-१, उप विभाग-२,

अनुक्रमांक-३, नियम क्रमांक -७ अनुसार प्रशासकीय विभागास असलेल्या अधिकारान्वये सदर शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा सांकेतांक २०२०११२०११३९०४००१३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Swati Suresh Lohar

Digitally signed by Swati Suresh Lohar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Medical Education And Drugs Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=eaef1faf1fb5262ec7b0737903120dfa387867f017650e284f3e90868f26d12d, serialNumber=ab72b061785ae0359686d1c8a0ddb0f52744a155be1924d6ab3706e1de7e60ec, cn=Swati Suresh Lohar
Date: 2020.11.20 13:48:22 +05'30'

सोबत :- परिशिष्ट-अ

( स्वाती लोहार )
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) - १/२, महाराष्ट्र, मुंबई / नागपूर.
२. व्यवस्थापकीय संचालक, हाफकिन जीव औषध निर्माण महामंडळ, मुंबई
३. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई.
४. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
५. सर्व संबंधित जिल्हा कोषागार अधिकारी
६. सर्व अधिष्ठाता / अधीक्षक, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालय
७. निवडनस्ती (प्रशासन -२)

# शासन निर्णय क्र. कोविड-२०२०/प्र.क्र. २६८ /प्रशासन-२, दिनांक २०.११.२०२० सोबतचे परिशिष्ट-अ

| SN | List of Drugs and Consumables required in Dedicated COVID hospitals | Total Requirement for 06 months | Estimated Cost of each Item (In Rs.) | Total Estimated Cost (In Rs) |
|---|---|---|---|---|
| 1 | Inj. Heparin 25000 IU | 97350 | 225 | 21903750 |
| 2 | Inj. Colestine 1mu | 32450 | 160 | 5192000 |
| 3 | Inj. Colestine 3mu | 19470 | 500 | 9735000 |
| 4 | Inj Insulin Aspart 10ml | 16225 | 1602 | 25992450 |
| 5 | Inj. Insulin degludec 3ml | 32450 | 1440 | 46728000 |
| 6 | Inj. Methyl Prednisolon 500mg | 32450 | 185 | 6003250 |
| 7 | Inj. AtropinSulphate | 65651 | 4 | 262604 |
| 8 | Inj. Adrenalin | 64900 | 15 | 973500 |
| 9 | Inj.Vit. C 500 mg | 194690 | 7.8 | 1518582 |
| 10 | Tab.Ascorbic Acid 500 mg | 649000 | 1.4 | 908600 |
| 11 | Tab.Zinc 50 mg | 649000 | 4.4 | 2855600 |
| 12 | Sterile Gloves Size 6.5 | 5859000 | 17 | 99603000 |
| 13 | Sterile Gloves Size 7 | 5849000 | 17 | 99433000 |
| 14 | Sterile Gloves Size 7.5 | 4550643 | 17 | 77360931 |
| 15 | Examination Gloves | 4550643 | 7 | 31854501 |
| 16 | High Concentration Mask | 32450 | 130 | 4218500 |
| 17 | NIV Mask Small | 6490 | 1295 | 8404550 |
| 18 | NIV Mask Medium | 12980 | 1295 | 16809100 |
| 19 | NIV Mask Large | 6490 | 1295 | 8404550 |
| 20 | Neb Maschine | 1623 | 1500 | 2434500 |
| 21 | Water Seald ICD Set | 6490 | 100 | 649000 |
| 22 | ABD Set | 6489 | 150 | 973350 |
| 23 | Cholestomy Bag | 3245 | 150 | 486750 |
| 24 | Triple Lumen Hemodylasis Cather | 9723 | 1875 | 18230625 |
| 25 | Triple Lumen Catheter | 16225 | 875 | 14196875 |
| 26 | 3 Layer Face Mask | 2628450 | 9 | 23656050 |
| 27 | Face Shield | 973400 | 125 | 121675000 |
| 28 | Disposable Goggles | 97350 | 100 | 9735000 |
| 29 | Disposable Syringe 20 ml | 454300 | 3.54 | 1608222 |
| 30 | Disposable Syringe 50 ml | 454300 | 15.12 | 6869016 |
| 31 | Disposable Insulin Syringe 1 ml | 649000 | 2.45 | 1590050 |
| 32 | Inj.Meropenum 1gm | 227150 | 137 | 31119550 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 33 | L M W H 0.6 ml | 324494 | 200 | 64898800 |
| 34 | Extension Line 100 cm | 324500 | 30 | 9735000 |
| 35 | Arterial Line 4 F | 9586 | 1500 | 14379000 |
| 36 | Spiral Extension Line | 9735 | 800 | 7788000 |
| 37 | HIV Kit | 389400 | 160 | 62304000 |
| 38 | Surgeon Cap | 389400 | 2.8 | 1090320 |
| 39 | Shoe Cover | 389400 | 5 | 1947000 |
| 40 | Plastic Apron | 389400 | 16 | 6230400 |
| 41 | Dial Flow | 64900 | 15 | 973500 |
| 42 | Inj. Propofol 20 ml Mct/lct | 64899 | 184.8 | 11993335 |
| 43 | Inj. Pantoprazole 40mg | 162250 | 15.48 | 2511630 |
| 44 | Inj. Ceftriaxone 1 gm | 162250 | 11.77 | 1909683 |
| 45 | Inj. Midazolam 5mg/ml | 32450 | 14.9 | 483505 |
| 46 | Inj. Linezolid 600mg | 64900 | 52.81 | 3427369 |
| 47 | Inj. Insulin Plain 40 IU | 162250 | 56.64 | 9189840 |
| 48 | Inj. Rocurronium 10mg | 162250 | 141 | 22877250 |
| 49 | Inj. Attracurrium | 64900 | 24.19 | 1569931 |
| 50 | Inj.Sodium bicarbonate 7.5% | 32450 | 12.3 | 399135 |
| 51 | Inj. Clindamycin 150mg | 32448 | 19.46 | 631438 |
| 52 | Inj.Amiodarone 50 mg | 12980 | 26.13 | 339167 |
| 53 | Inj.Adinosine 6 mg | 12980 | 258 | 3348840 |
| 54 | Inj.Metoprolol | 32450 | 15 | 486750 |
| 55 | Tab. N-Acetyl cystine | 167624 | 245 | 41067880 |
| 56 | Tab.Pirfenidone 200 mg | 330874 | 230 | 76101020 |
| 57 | Inj.Piperacillin + Tazobactum 4.5 | 324500 | 55 | 17847500 |
| 58 | I.V. Levoflox 5mg/ml 100 ml | 33208 | 14.04 | 466240 |
| 59 | Inj.Gentamycinsulphate 40mg | 33978 | 3.5 | 118923 |
| 60 | Inj.Dexamithasone Sodium 4mg | 129800 | 3 | 389400 |
| 61 | Distilled Water 3 Lit | 6617 | 350 | 2315950 |
| 62 | Tab. Ivermectine 6 mg | 97350 | 3.5 | 340725 |
| 63 | Inj. Leveteracetam | 16225 | 50 | 811250 |
| 64 | AsthalineRespules | 32450 | 8 | 259600 |
| 65 | DuolineRespules | 32450 | 8 | 259600 |
| 66 | Viral Filter | 16225 | 300 | 4867500 |
| | | **Total** | | **1074744938** |